Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# स्त्री नाटककार - (प्रारंभापासून साल २००० पर्यंत)

**सौ. क्षितिजा आगाशे,** (एस.एन.डी.टी.) विद्यापीठ, मुंबई
**डॉ. विनोद उपरवट,** मार्गदर्शक, कला वाणिज्य महिला महाविद्यालय, देवपूर, धुळे

भरतमुनींनी लिहिलेल्या नाट्यशास्त्र या ग्रंथाच्या सुरुवातीपासून आजपर्यंत काळाच्या विविध टप्प्यावर पडताळून पाहिले असता स्त्रीचे नाट्यक्षेत्रातील योगदान एका ठराविक मर्यादेच्या कक्षेत सामावले आहे असे लक्षात येते.

अगदी पोरवयात असताना सुद्धा भातुकलीचा खेळ समरसून खेळणारी आणि त्यातील नाट्य भरभरून अनुभवणारी प्रत्येक स्त्री स्वतःच्या मनाच्या पटलावर म्हणजे मनाच्या रंगभूमीवर तिच्या तिच्या पुरतं एक नाट्य खरंतर रंगवतच असते. आणि स्त्रीचे आयुष्य तिच्या वैयक्तिक ,सांस्कृतिक, सामाजिक, कौटुंबिक अवकाशात अनेकाविध आव्हान, अपेक्षा आणि तिचं अस्तित्व याला पदोपदी कवटाळत पेलतच पुढे जात असत.

मात्र तरीही नाटकाच्या अवकाशात तिच प्रत्यक्ष योगदान मात्र मर्यादितच दिसतं. मुळात भारतातील एकंदरीत सामाजिक स्थितीगतीचा शोध घेताना भारतीय समाज जीवनात स्त्रीचे स्थान दुय्यम होत, हे मान्य करायलाच हवं त्यामुळे स्त्रीच्या अंगात अगदी नैसर्गिकपणे असलेली सृजनशीलता आणि नाट्य निर्मितीच्या क्षमतेला साहित्य विश्वात सहजपणे स्वीकारले जाईल, अशा पद्धतीने वाव दिला गेला नाही हे वास्तवही नाकारून चालणार नाही. मात्र यावरून स्त्रीकडे सृजनशीलता नव्हती असे म्हणणे म्हणजे स्त्रीच्या सूक्ष्म जाणिवांचा पट नाकारण्यासारखे होईल.

नाट्य विश्वाचा अभ्यास करताना एकीकडे आपण लोकरंगभूमी हा नाट्य निर्मितीचा एक अविभाज्य भाग आहे असे मानतो. आपल्या सांस्कृतिक वाटचालीतही स्त्रियांचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष नाट्यमय सृजन ठाई ठाई दिसते. अनेक ठिकाणी साजरे होणारे विविध सण, उत्सव, लोकगीते, प्रथा, रूढी ,परंपरा आणि त्या अनुषंगाने येत राहणारी लोकनाट्याची परंपरा याचा धांडोळा घेतला तरी ही गोष्ट सहजपणे जाणवते. अगदी सहजपणे डोळयासमोर येणाऱ्या काही रचना म्हणजे ओव्या असतील भजन असेल, निरनिराळया सण उत्सव प्रसंगी म्हटले जाणारी विधी गीते असतील त्यातही अनेकदा स्त्रियांच्या सृजनशीलतेचा प्रत्यय येत राहतो. अगदी भोंडल्याची गाणी, यामध्ये घरातील निरनिराळया नात्यांमध्ये उद्भवणारे ताणतणाव आणि गमतीजमती यातून नाट्य उभे करतच असतात स्त्रिया!

तसेच पारंपरिक ओव्यांचा अभ्यास केला तरी आपल्या माहेरचे गोडवे, सासरी होणारा जाच, नणंद भावजयांमधील संबंध, मातृप्रेम, भ्रताराचे कौतुक या सर्व विषयांमध्ये नाट्य ठासून भरलेले असते. मात्र त्याला ठराविक संहितेची चौकट नसल्याने त्याकडे नाट्य म्हणून बघितले जात नाही.
उदा. सासुरवाशीण सून रुसून बसली कैसी? यादव राया राणी घरासी येईना कैसी?

या भोंडल्याच्या गाण्यांमध्ये घरातल्या सुनेला अपेक्षित असणारा मान न मिळाल्यामुळे ती रुसून माहेरी गेल्याचे नाट्य रंगवले जाते.

नातेवाचक ओवी
अक्काची ग चोळी। येते माझ्या अंगा।


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

आम्ही दोघी बहिणी । एका वेलीच्या दोन शेंगा ॥
काळी चंद्रकळा । माझ्या मनात घ्यावी होती ।
हौस भर्तारिने । आणिली अंगमती ॥[२]

अशी कितीतरी अधिक उदाहरणे देता येतील. मात्र त्यातील नाट्यमयतेला रूढ अर्थाने नाटक म्हणून स्वीकारले गेले नाही.

कोणत्याही नाट्यप्रयोगात आवश्यक असणाऱ्या तादेयुष कौजान यांनी सांगितलेल्या १३ चिन्ह सरणी पाहिल्या तर त्यातील शब्द, शब्दसंहितेचे उच्चारण, चेहऱ्यावरील भाव, हावभाव नटांच्या हालचाली, रंगभूषा, केशभूषा, वेशभूषा, रंगमंचावरील सामग्री, नेपथ्य या दहा गोष्टी विविध विधींमध्ये आवश्यक होत्या आणि त्या स्त्रियांचा सहभागही होता. तसेच जाणीवपूर्वक वापरली गेलेली संगीत आणि ध्वनि योजना ही पण असे, मात्र फक्त प्रकाश योजनेचा मात्र तितकासा उपयोग करून घेतला जात नसे. म्हणजेच सर्व विधींमध्ये नाटकातील विविध घटकांचे उपयोजन स्त्रियांकडून केले जात असे. मात्र त्याला नाटकाचे स्वरूप आहे आणि त्यात स्त्रियांचा सहभाग आहे, अशी अधिकृत मान्यता मात्र कधी देण्यात आली नाही. संगीत योजना करताना सुद्धा त्यात स्त्रियांचा सहभाग सक्रिय होता. या विधींच्या सादरीकरणाच्या वेळी गरजेचे असणारे ध्वनी आणि संगीत योजना याचेही उपयोजन स्त्रिया करीत असत. फक्त मुद्दामून केली जाणारी प्रकाश योजना मात्र नसे.

मात्र त्यातील स्त्रियांची भूमिका विशेषत्वाने कोठेही नोंदवण्यात आली नाही. त्यामुळे रूढार्थाने नाट्य क्षेत्रात स्त्रियांचा सहभाग फारसा उठावदारपणे कुठेही दिसत नाही. त्याही आधी म्हणजे अगदी भरत मुनींनी नाट्यशास्त्र लिहिले त्या काळातही स्त्री पात्रा शिवाय नाट्याची शोभा वाढणार नाही या हेतूने मञ्जुकेशी, सुलोचना, सौदामिनी ,सुकेशी अशा २३ अप्सरा भरतमुनींकडे सोपवल्या असा उल्लेख आढळतो. मात्र यात सर्वांना सुपरिचित असणाऱ्या रंभा ,उर्वशी, मेनका यांचा उल्लेख नाही.

नाट्यशास्त्रात येणारा अप्सरांचा उल्लेख त्यांच्या कलावंत असण्याची ग्वाही देतो. म्हणून त्यांचा समावेश नाट्यकलेत केला आहे .मात्र त्यांची व्याप्ती कोणाची समाधी भंग करण्यापुरती मर्यादितही नाही. अगदी वेदवाङ्मयाचा धांडोळा घेतला तरी त्यात अनेक स्त्रियांचा सहभाग आढळतो. ब्रम्हवादीनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अनेक स्त्रिया जशा लोपामुद्रा ,गार्गी ,मैत्रेयी ,सुलभा ,चुडला या ऋषीका वैदिक काळातील लिहित्या स्त्रिया होत्या. मात्र त्यांनी नाट्यसंहिता लिहिण्याचे ठोस पुरावे कुठेही उपलब्ध नाहीत. असे असले तरीपण स्त्रियांचा नाट्य क्षेत्रातील सहभाग तेव्हा सर्वमान्य नसावा. तसेच काळाच्या ओघात बदलत गेलेल्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक परिमाणांमुळे सार्वजनिक जीवनातील स्त्रीचा वावर यावर खूप मर्यादा आल्या. आपल्या देशात रूढ असणारी पुरुषप्रधान संस्कृती आणि पितृसत्ताक पद्धती यामुळे स्त्रियांच्या कर्तृत्वाला वाव देण्यासाठी घरातील पुरुषाचे पाठबळ असणे गरजेचे होते.

महाराष्ट्रातील नाट्यपरंपरेचा इतिहास पाहता १८४३ मध्ये विष्णुदास भावे यांचे नाटक 'सीता स्वयंवर' याने रंगमंचीय नाटकाची मुहूर्तमेढ रोवली असे आपण मानतो. मात्र त्यातही स्त्रियांच्या भूमिका पुरुष पात्रेच करीत. आणि त्याचे लेखनही स्वतः विष्णुदास भावेच करीत.

खरंतर त्याआधी सुद्धा कर्नाटकात तंजावर येथे १७ व्या शतकात मराठी राजांच्या दरबारात मराठी नाटकाचे प्रयोग झाल्याचे पुरावे आढळतात. परंतु सर्वसामान्य जनांपर्यंत ते नाटक न पोचल्याने ते राजांच्या दरबारापर्यंत सीमित राहिले. त्याचेही लेखन राजघराण्यातील पुरुषांनीच केलेले आढळते. या विष्णुदासप्रणित नाटकांमध्ये लोकरंगभूमीपासून प्रेरणा घेतलेल्या यक्षगायनाचा प्रभाव आढळतो. त्याआधी मराठी संस्कृतीचा


Copyright © | JET Network, All Rights Reserved

मानबिंदू मानला जाणाऱ्या लोक रंगभूमीच्या माध्यमातूनही अनेक कलाप्रकार नाट्याच्या अंगाने सादर होतच होते.

कळसुत्री बाहुल्यांचे खेळ, सोंगी भजने, खेळे, ललीत, भारुड ,दशावतार, नमन तमाशा, गोंधळ, पोवाडा, वासुदेव इत्यादी कला एक प्रकारे नाट्य विकासाला अनुकूलच होत्या, परंतु त्यांचे स्वरूप लवचिक होते. आणि त्यात सांस्कृतिक वारसा जपण्याचा भागही जास्त होता. आणि या सादरीकरणात सुद्धा कोणत्याही सादरीकरणाच्या लेखनामागे असलेली प्रेरणा स्त्रीला मानले आहे, असे तत्त्वतः मान्य केले गेले नाही. हळूहळू जसजशा सामाजिक सुधारणा होऊ लागल्या तसतसे काही स्त्रियातील सृजनशीलतेला वाव देणारी काही पुरुष मंडळी कधी पित्याच्या तर कधी पतीच्या तर काही कधी मार्गदर्शकाच्या भूमिकेतून स्त्रियांच्या नाट्य लेखनाला वाव देऊ लागले असे दिसते. यापुढे आपण स्त्रियांनी केलेल्या नाट्य लेखनाचा आढावा घेऊ.

**पहिल्या स्त्री नाटककार सौ. काशीबाई फडके**

१८८७ साली काशीबाई फडके या चौदा वर्षीय कन्येने आपल्या वडिलांच्या प्रेरणेने 'सीताशुद्धी' हे नाटक लिहिल्याचे आपल्या 'विस्मृती चित्रे' या पुस्तकाद्वारे अरुणा ढेरे यांनी जगापुढे आणले. डॉक्टर तारा भवाळकर यांनी याबद्दल पहिल्यांदा संशोधन करून मांडणी केली आहे. हे नाटक लेखिकेच्या मृत्यूनंतर (वय 14) प्रसिद्ध झाले.

**साल १८९७**

त्या काळात कुलीन स्त्रियांनी नाटक लिहिणे इष्ट समजले जात नसे. या नाटकात राम सीतेच्या वनवासापासून रामाच्या राज्याभिषेकापर्यंत सर्व घटना संवादातून कथा सांगितल्याप्रमाणे येतात. या नाटकाचा प्रयोग झाल्याच्या कोणत्याही खुणा सापडत नाहीत.

**सोनाबाई केरकर**

गोवा प्रांतातील केरी गावात राहणाऱ्या चिमाजी केरकर यांची कन्या सोनाबाई केरकर हिने ऐतिहासिक संगीत नाटक लिहिले. त्याचे नाव 'संगीत छत्रपती संभाजी' नाटक हे पाच अंकी नाटक असून अत्यंत मनोरंजक ऐतिहासिक शोकपर्यवसायी नाटक असा त्याचा उल्लेख त्यांनी केला आहे. त्यांचा मृत्यू इसवी सन १७ जुलै १८९५ रोजी झाला. त्यानंतर एक वर्षाने इसवीसन १८९६ मध्ये त्यांचे नाटक प्रकाशित करण्यात आले.

या नाटकाच्या शेवटी लेखिकेने संभाजी कुसंगती घडल्यामुळे सर्व राज्याची राखरांगोळी झाली, असा निष्कर्ष काढणारा एक निबंध ही जोडला आहे. यात लेखिकेचा संभाजी महाराजांच्या चरित्राचा अभ्यास जाणवतो.

छापील ग्रंथाच्या सहाय्याने ठरवायचे तर सोनाबाई केळकर ह्या पहिल्या स्त्री नाटककार ठरतात. ज्योतिबा फुले यांच्या 'तृतीय रत्न' या नाटकाला ज्याप्रमाणे प्रसिद्ध न झाल्याने अनेक वर्ष पहिल्या नाटकाचा मान मिळू शकला नाही. त्याचप्रमाणे काशीबाई फडके यांचे नाटक नंतर प्रसिद्ध झाल्यामुळे त्यांना प्रथम नाटककाराचा मान मिळू शकला नाही.

**हिराबाई पेडणेकर**


Copyright © | JET Network, All Rights Reserved

हिराबाई पेडणेकर या कलावंतीण या वर्गातील असल्याने त्यांना उपेक्षित आयुष्य जगायला लागले. त्यांनी एकूण तीन नाटक केली होती 'संगीत जयद्रथ विडंबन' आणि 'संगीत मीराबाई' ही दोन नाटके पौराणिक कथानकांवर आधारित आहेत.

तर 'संगीत दामिनी' साल १९१२ हे सामाजिक विषयाशी संबंधित ढोंगी साधूंच्याकडून होणाऱ्या स्त्रियांच्या फसवणुकीवर आधारलेले नाटक आहे. ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी चालवलेले स्त्री शिक्षणाचे प्रयत्न आणि संगीत नाटकांचा प्रभाव यातून समाजात हळूहळू होऊ लागलेली जागृती याचे परिवर्तन म्हणून वरील तीनही नाटककारांनी संगीत नाटके लिहिली, आणि त्यात ऐतिहासिक सामाजिक पौराणिक असे विषय हाताळले.

**गिरीजाबाई केळकर**

१९२० ते १९५० या कालखंडात औद्योगीकरण, दोन महायुद्धे ,त्याचवेळी होणारा स्त्री शिक्षणाचा प्रचार प्रसार, पुरुषी वर्चस्व आणि स्वतःचे स्वत्व शोधू पाहणारी स्त्री या सर्व घटकांमुळे नाटकाचे स्वरूप हळूहळू बदलत होते.

विसाव्या शतकातील आरंभीच्या काळात गिरीजाबाई केळकर यांचे स्थान फार महत्त्वाचे आहे त्यांनी एकूण पाच नाटके लिहिली.

गृहिणी भूषण १९१२ (बाल विधवांचा प्रश्न), पुरुषांचे बंड १९१३, (खाडीलकरांचे बायकांचे बंड या नाटकावरून प्रेरित), आयेशा १९२१ (हिंदू मुसलमान एकी), राजकुंवर १९२४ (शिवाजी महाराजांच्या कन्येवरील ऐतिहासिक नाटक) यात राष्ट्र कार्यात पुरुष कुचराई करत असतील तर तेजश्रीपणे स्त्रियांनी पुढाकार घ्यावा असे त्या सुचवतात. हीच मुलीची आई १९३२, ही नाटके लिहिली.

त्या प्रस्तावनेत म्हणतात पुरुषांना अपमानास्पद कटू शब्द न बोलता स्त्री-पुरुषांच्या कर्तव्याची जाणीव करून देणे आणि स्त्रियांना आदर व मान मिळावा या हेतूने हे लेखन स्त्री व पुरुष विरोधी नसून पूरक आहेत हे सांगण्यासाठी केले आहे.

**मालती तेंडुलकर**

स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी, आणि घटस्फोटाचा कायदा यावा म्हणून 'अर्धांगी' हे नाटक मालती तेंडुलकर यांनी १९३३ मध्ये लिहिले.

त्याचप्रमाणे आनंदीबाई किर्लोस्कर यांनी १९४३ मध्ये 'नव्या वाटा' या नाटकातून गुन्हेगार पती असलेल्या पत्नीची समस्या मांडली आहे.

**मालतीबाई बेडेकर (बाळू ताई खरे)**

परित्यक्ता स्त्रीला समाजाकडून मिळणारी अपमानास्पद वागणूक तिचे चारित्र्यहनन यावर भाष्य करणारी 'पारध' ही एकांकिका मालतीबाईंनी लिहिली. यात नाट्यतंत्राकडे दुर्लक्ष झाले आहे. हुंडा वधू परीक्षा यासारख्या स्त्रीसाठी अत्यंत त्रासदायक असणाऱ्या रूढी परंपरांवर भाष्य करणारे 'संगीत एकच गाठ' हे नाटक सुधा साठे यांनी लिहिले आहे. कमला प्रभू लिखित 'संगीत घराकडे' १९४८ या नाटकातील या मधील स्वाभिमानी, सुरेखा "सहजासहजी पायाखाली तुडवायला स्त्रिया म्हणजे कचकड्याच्या बाहुल्या नाहीत आणि त्यांचे शील म्हणजे वाऱ्या शिवाय गळून पडलेला पालापाचोळा नाही" असे खडे बोल ऐकवते. शकुंतला परांजपे यांनी फ्रेंच मधून मराठीत अनुवाद केलेली 'सोयरीक' आणि 'चढाओढ' ही प्रहसने मार्मिक आणि विनोदी आहेत. स्त्रियांना विनोद बुद्धी नसते, या सरसकट केल्या जाणाऱ्या विधानाला ही नाटके छेद देतात.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

उमाबाई सहस्त्रबुद्धे यांनी संगीत काहूर हे अकल्पित योगायोगाने उद्भवणारे नाटक १९४८ मध्ये लिहिले तर संगीत लोकराज्य (वृंदा) १९४८ या नाटकाद्वारे त्यांनी संस्थानातील वातावरण, नगररचना, नगरपालिका, कामगार आणि मालक यांचे प्रश्न यावर प्रकाश टाकला.

कृष्णाबाई मोठे यांनी १९५० मध्ये जुन्या व नव्या विचारांची सांगड घालणारे माझी 'गुणाची पोर' हे नाटक लिहिले तर विमल काळे यांच्या 'भुईला भार' या नाटकात प्रत्येकाने सामाजिक देणे देत जगावे असे मांडले.

१९५० मध्ये पद्मा गोळे यांनी स्त्रीच्या स्वतंत्र विचारशक्ती आणि निर्णय क्षमतेला वाव देणारे 'नवी जाणीव' हे नाटक लिहिले.

१९२० ते १९५० या काळात पुरुषप्रधान संस्कृतीचा पगडा कायम होता. या कालखंडात स्त्री-नाटककारांची विविध विषयांवरील नाटके प्रकाशित झालेली दिसतात. आध्यात्मिक विषयावरील 'भागीरथीबाई वैद्य' यांचे 'ब्रह्मात्म बोध' किंवा 'संगीत सद्गुरू नाटक' हे नाटक या दृष्टीने लक्षणीय आहे. या काळात स्त्री-नाटककारांमध्ये 'कर्नाटक कन्या' (स्वदेशी व्रत, १९२१), 'क्षमाबाई राव' (केवळ ध्येयासाठी, १९२६), 'शिंदे चंद्राबाई' (गृहिणीधर्म), 'इंदिराबाई पेंडसे' (कुलभूषण, १९३३) 'वनिता गणेश देसाई' (प्रेमरहस्य, १९३४ आणि म्हाराची पोर, १९३६), 'मनोरमाबाई लेले' (प्रणयप्रचिती, १९३५ ), 'माई वरेरकर', (काकाची शशी, १९३८) द्वारका दत्तात्रय गुप्ते (प्रेमाचा होम, १९४१) विमल घैसास, (नंदादीप, मदिरा), इंदुमती देशमुख (शीला, १९४९) इत्यादींची नाटके उल्लेखनीय ठरतात.

स्वतंत्र भारताच्या संविधानाने स्त्रीला अनेक हक्क प्रदान केले. आणि त्यामुळे हुंडाबंदी ,द्विभार्या प्रतिबंधक कायदा, वारसा हक्क, घटस्फोटाचा अधिकार, यामुळे स्त्री जीवन थोडे सुसह्य झाले. १९५१ ते २००० या कालखंडात स्त्री नाटककार यांनी लिहिलेली चाळीसहून अधिक नाटके प्रकाशित झाली त्यात अनेक विषय हाताळले गेलेले आहेत. यात सामाजिक, कौटुंबिक, राजकीय, पौराणिक, विनोदी, फार्स, कल्पनारम्य, भक्तीरसप्रधान, मनोविश्लेषणात्मक, शास्त्रीय असे अनेक विषय आहेत.

शांता निसळ यांनी प्रौढ कुमारिकेच्या प्रश्नांवर प्रकाश टाकणारे 'सौभाग्यकांक्षिणी' हे १९५४ आणि 'मृत्यू माघारी गेला' १९९७ ला प्रकाशित केले. सुविचारी मुलींना शिक्षणाचे धडे मिळाले असती परिस्थितीचा बारकाईने विचार करून जीवन सुखी करेल हा सिद्धांत मालती दांडेकर यांनी 'ज्योती' १९५५ यातून मांडला. घरातील तरुण मुलींच्या वैचारिक भूमिकेला घरातल्या स्त्रियांचे सहाय्य व मार्गदर्शन व्हावे त्यांनी आपल शील जपावे असे मालतीबाई 'पर्वकाळ ये नवा' मध्ये सांगतात. १९६८ 'मावशी दि ग्रेट' हे नाटक मालतीबाई दांडेकर यांचे असून ते विनोदी हास्यरस प्रधान आहे. त्याकाळी सुद्धा नाटकाच्या शीर्षकांमध्ये इंग्रजी शब्द वापरले जायचे हे यातून स्पष्ट होते. तसेच यात सोनू मावशी आणि देवयानी या दोन भूमिका एकाच अभिनेत्रीने कराव्यात अशा पद्धतीने नाटक लिहिले आहे.

तारा बनारसी यांचे 'कक्षा' १९५५ यात स्त्रीच्या आयुष्याच्या कक्षा तिच्या तिने रुंदावल्या पाहिजेत असे लेखिका सांगते.

कुमुदिनी रांगणेकर यांचे आंधळी कोशिंबीर हे कमावणाऱ्या स्त्रीचे लग्न होणे व लांब होणाऱ्या पालकांची मनोवृत्ती दाखवणारे नाटक आहे. तसेच वडिलांचा संसार वाचवण्यासाठी अविवाहित राहण्याचा निर्णय घेतलेल्या कुमारीकेची भावनिक आणि शारीरिक उपासमार या विषयावर सरिता पदकी यांनी 'बाधा


Copyright © | JET Network, All Rights Reserved

रे' नावाचे लक्षणीय नाटक १९५६ मध्ये लिहिले. तसेच 'खून पहावा करून', 'एक प्रेम झेलुबाई', 'पांथस्थ' (अनुवादित) ही नाटके उल्लेखनीय आहेत.

हुंडा प्रश्नाला हात घालणारे उमाबाई भट यांचे 'पत्यांचा बंगला' हे नाटक लग्न इच्छुक मुलाचा भाव त्याच्या ऐपतीवर ठरतो याची जाणीव करून त्यावर महिलांनी सुधारणा करावी असे सुचवणारे आहे.

'हिरा जो भंगला नाही' हे नाटक फ्रेंच नाट्यकर्ती मादाम मार्शल मॉरिट यांच्या Anaastasia या नाटकाच्या आधारे लिहिला असल्याचा उल्लेख यात आहे.

**शशिकला आळंदकर**

या कालखंडात स्त्रियांसाठी लिहिलेल्या नाटकांमध्ये शशिकला आळंदकर यांचे नाव उल्लेखनीय आहे. त्यांची 'सोनेरी चौकट', 'पिंजरा', 'लोकां सांगे ब्रह्मज्ञान', 'एकदाच गाऊ दे', 'संगीत तारू लागले किनारी' (१९५९) ही नाटके प्रकाशित झालेली आहेत. त्यापैकी 'लोकां सांगे ब्रह्मज्ञान' हे संपूर्ण विनोदी नाटक आहे. 'संगीत तारू लागले किनारी' हे नाटक विषयाच्या दृष्टीने वेगळे आहे.

निव्वळ अफवांमुळे एखाद्या मुलीचे ठरलेले लग्नही मोडू शकते, हेच 'संगीत तारू लागले किनारी' या नाटकातून  लेखिकेला सुचवायचे आहे. सुमती देवी धनवटे यांचे 'धुळीचे कण' १९५९,  हे नाटक बाह्य सौंदर्यावर बोलणाऱ्या जगाला आंतरिक सौंदर्याचे महत्त्व समजावून सांगणारे होते. याच कालखंडात विमल काळे यांनी तीन नाटके लिहिली.  'भुईला भार' 'छाया' आणि 'संगीत मृगजळ' १९६० वर वरची माहिती काढून केवळ बाह्य श्रीमंतीलापेक्षा वरवर कमी दर्जाचे वाटणारे परंतु खात्रीचे स्थळ लग्नासाठी निवडावे असा संदेश हे नाटक देते.

वधु परीक्षा आणि परस्त्री आकर्षण या विषयांवर या काळात सौ. मालती जोशी यांनी संगीत 'लग्नाची मुलगी' १९६३ सुहासिनी अभ्यंकर यांची 'इथेच जन्मली व्यथा' १९७०, माया अकोलकर  'नंदादीप देवतार' हा १९६३ ,या तीन  स्त्री नाटककारांची प्रकाश नाटके प्रकाशित झालेली आहेत. प्रीती विवाह फसला तरी त्यातून मार्ग काढणाऱ्या साधनेचे चित्र 'इथेच जन्मली व्यथा' या नाटकातून दिसते. लेखिका सुहासिनी अभ्यंकर पर स्त्री चे आकर्षण आणि त्यामुळे संसाराला महत्त्व न देणे याबद्दल आहे. माया अकोलकरांचे  हे नाटक भाष्य करते. याच विषयावर माया अकोलकर यांचे 'नंदादीप तेवत रहा' आणि आशा परचुरे यांचे 'समर्पण' १९९० हे नाटक लिहिले आहे. आशा परसुरे यांनी 'जयराम सांगे' या फार्समध्ये अनुरूप असे संवाद आणि भाषा आहे.  एकूणच, 'फार्स' या वाङ्मय प्रकारामध्ये 'आशा परचुरे' यांचे स्थान नोंद घेण्याजोगे आहे.

**लीला फणसळकर**

'लीला फणसळकर' यांची तीन नाटके या कालखंडात महत्त्वाची आहेत.

१) 'भावना' (१९६३),

२) 'रात्र संपली.... पण उजाडलं कुठं ?' (१९६९),

३) 'सती चांगुणा हाक फोडी' (१९७६).

'भावना' हे एक मनोरंजक नाटक आहे. या नाटकामध्ये सगळ्या भावनांचे मिश्रण आहे. या लीला फडणसळकरांचे 'रात्र संपली पण उजाडल कुठे' या नाटकात वेड्यांच्या इस्पितळामध्ये उपचार घेऊन बरे झाल्यानंतर घरी आलेल्या मंदाताईंना आशेचे किरण देणाऱ्या भावी सुनेचे चित्र रेखाटले आहे. ज्योत्स्ना देवधर यांचे 'कल्याणी' १९६८ हे नाटक राजस्थानमधील परंपराचे प्रतिनिधीत्व करणारे नाटक आहे. त्यांच्या


Copyright © | JET Network, All Rights Reserved

स्वतःच्या 'कल्याणी' या कादंबरीचे हे नाट्यरूपांतर 'कल्याणी' या नाटकातील स्त्रिया या सगळ्यां रूढी परंपरांच्या चक्रात अडकून आहे तसेच सोसत राहतात.

**शिरीष पै**

पारंपरिक चौकटीपेक्षा वेगळ्या विषयावरची नाटके लिहिण्या नाटककारांमध्ये 'शिरीष पै' यांच्या नावाचा उल्लेख करता येतो 'सोन्याची खाण' (१९६७), 'हा खेळ सावल्यांचा' (१९६८), 'कळी एकदा फुलली होती' (१९७३), 'झपाटलेली' (१९७५) इत्यादी त्यांची लक्षणीय आहेत. 'कळी एकदा फुलली होती' हे नाटक सत्यघटनेवर आहे.

'झपाटलेली' या नाटकाचा विषय वेगळा आहे. या नाटकाची 'शुभांगी' पिशाच्याने झपाटलेली आहे. त्याबरोबरच ती मनोरुग्णही आहे. शेवटी स्वरूपांसारखे श्रेष्ठ योगी आधी मानसिक आणि शारीरिक पातळीवर तिच्यावर मंत्रप्रयोग करून तिच्यातील अंतर शक्तीला जागृत करायला लावून पिशाच्चबाधा झुगारून द्यायला लावतात. त्यादृष्टीने 'शिरीष पै' यांचे वेगळेपण नाट्यवाङ्मयाच्या इतिहासात नोंदवता येते.

भक्तिरसप्रधान नाटक लिहिणाऱ्या स्त्री-नाटककारांमध्ये 'सौ. सुहसिनी कृष्णराव वाझकर' यांचे नाव घेता येते. त्यांचे 'रीती अशी प्रीतीची' (१९६१) हे नाटक त्यादृष्टीने उल्लेखनीय आहे. निष्काम भक्तीवर आधारित हे नाटक आहे श्रीकृष्णचरित्र म्हणजे भक्ती, प्रीती आणि सौख्य यांचा सुरेख संगम.

सुधा देशपांडे यांचे 'देवाघरची वाट' हे नाटक माणसात असलेल्या देवाची आठवण करून देणाऱ्या चित्रगुप्त बद्दल बोलते. देव प्रत्येक माणसात असून तुमचं सुखदुःख तुम्हीच निर्माण करता. असा संदेश या नाटकात दिला आहे.

कविता नरवडे यांची 'नेपोलियन' आणि 'फक्त तीन महिने' ही दोन नाटके उल्लेखनीय आहेत. नेपोलियन या नाटकातून त्याच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंवर प्रकाश टाकला आहे. 'फक्त तीन महिने' यात नाटकात आपल्या जवळच्या व्यक्तीच्या मृत्यूची अगोदर कल्पना आली तर प्रत्येकाच्या किती निराळ्या प्रतिक्रिया असतील याबद्दल भाष्य केले आहे.

वाङ्मयीन मूल्य आणि प्रयोगमूल्य या दोन्हीच्या दृष्टिकोनातून यशस्वी स्त्री नाटककार म्हणून सई परांजपे यांनी विलक्षण ठसा उमटवलेला आहे त्यांची 'नांदा सौख्यभरे' 'इडा पिडा टळो' 'जास्वंदी' १९७६ 'माझा खेळ मांडू दे' १९७६ 'सख्खे शेजारी' 'अधिकता' इत्यादी नाटके महत्त्वपूर्ण आहेत. त्यातील 'जास्वंदी' या नाटकाचे गुजराती 'जास्वंदी' सिंधी, पंजाब, हिंदी व मराठी असे चार वेगळ्या भाषांमधून प्रयोग झाले आहेत. मन्या आणि बन्या या दोन मांजरांच्या दृष्टिकोनातून जास्वंदी या नाटकाचे सूत्र लेखिकेने मांडले आहे. 'माझा खेळ मांडला' यामध्ये तीन स्त्रियांच्या समस्या मांडलेल्या आहेत

**नाट्यलेखनात स्त्रिया मागे का?**

नाट्य लेखन हा प्रकार इतर साहित्य प्रकार जसे की कथा, कविता, कादंबरी यासारखा स्वतंत्रपणे लिहिता येऊ शकत नाही. नाट्य सोडून इतर सर्व साहित्य प्रकारांमध्ये लेखिकेच्या मनातील भावना कागदावर उतरवल्या की तिचे कार्य पूर्णत्वास जाते. मात्र नाटक ही कला पराश्रयी आहे. मुळात नाटक लिहिताना ते सहज लिहिता येऊ शकत नाही त्याची विचारपूर्वक योजना करावी लागते. संपूर्ण साहित्याच्या जगतात अनेक स्त्री नाटककार अत्यंत कुशल प्रतिभेने नाटक लिहितात खरे परंतु त्यातील अनेक नाटकांना रंगमंचावरती सादर करण्याचा योग येत नाही. काही नाटके तात्कालीक कारणासाठी लिहिली जातात. यात सर्वात मोठ्या प्रमाणात नाटके ही विविध स्पर्धांसाठी, हौशी रंगभूमीसाठी, स्पर्धात्मक रंगभूमीसाठी, शालेय रंगभूमीसाठी,


Copyright © | JET Network, All Rights Reserved

तसेच प्रायोगिक रंगभूमीसाठी लिहिली जातात. मात्र साहित्याच्या प्रमुख प्रवाहामध्ये त्याची नोंद घेतली जात नाही. तर काही नाटके एखादा प्रयोग होऊन तिथेच थांबतात. खरे तर स्त्रीचे आयुष्य संपूर्णपणे नाट्यमयतेने भरलेले असते.  असंख्य स्त्रिया आजही नाट्यलेखन करत आहेत मात्र ती नाटके प्रकाशात येत नाहीत. पण तरीही त्यांच्या नाट्यलेखनाचा दर्जा निम प्रतीचा आहे असे म्हणून चालणार नाही. विविध प्रकारे संकलित केलेल्या माहितीतून सातत्याने नाट्य लेखन करणाऱ्या काही प्रथितयश महिला नाटककारांची यादी सोबत जोडत आहे.

ज्योती म्हापसेकर यांनी लिहिलेले ‘मुलगी झाली हो’ हे नाटक विलक्षण लोकप्रिय ठरले. शास्त्रीय संशोधनावर आधारित असे नाटक लिहिणाऱ्या मीना देशपांडे यांचे ‘नाव सांगा कोणाची’ १९९९ हे नाटक लक्षणीय आहे. सौ. जयश्री घारपुरे यांनी सावरकरांच्या पत्नी यमुनाबाई यांच्या जीवनावर ‘माई’ २००० हे नाटक लिहिले. सौ. शांताबाई गोखले यांच्या ‘वृंदावन’ या माई सावरकर यांच्या जीवनावर आधारित कादंबरीवर हे नाटक लिहिलेले आहे.

अगदी अलीकडील प्रश्न हाताळणारे मेधा तेलंग यांचे ‘मनोमयी’ हे नाटक मानसिक विकृतीकडे झुकणारे आहे. 'विजया आपटे आणि सदाशिव आठवले' (हा व्यवहार आहे १९५३), आनंदीबाई लोणकर (पारिजातक, १९५३), चंद्राबाई कर्नाटकी (शबरी, १९५७), लीलावती शंकर आठवले (संगीत कलिप्रताप, १९५८), ज्योत्स्ना भोळे (आराधना, १९६०), वसुंधरा पटवर्धन (हिरकणी, १९६१) सीमा साखरे (महाराष्ट्राचा मोहरा, १९६६), सुमती क्षेत्रमाडे (मीच जाहले माझी मृगया, १९६३), अरुंधती (रोपचार, १९७३), (अशी ही प्रीत जगावेगळी, १९७४, १९६७), अरुंधती [(टोपणनाव) आपले आण्णा, १९६८)], विमल लेले (कथा ही पुण्या शक्तसेवा, सटक, १९७६ आणि रामविजय (मराठी ललिता या १९८४, कुंदा पारसनीस (पडदा, १९७६) सौ. सुलभा ठकार (संगीत इंद्रधनू, १९८२), रेखा बैजल (आकाश ओढ, १९८२), सौ. उषा कुलकर्णी (कसोटीचा क्षण, १९८५), वसुधा पाटील (महाभारत, १९८७), कै. माई पुंडलिक कुंभार (कर्णाचे बारसे, १९९०) इत्यादींची नाटके उल्लेखनीय ठरतात.

**वसुधा पाटील**

वसुधा पाटील यांनी १८८७ मध्ये ‘महाभारत’ नावाचे पौराणिक नाटक प्रकाशित केल्याचा उल्लेख सापडतो.

**पुरुषोत्तम करंडक एकांकिका लेखन स्पर्धा यामधील स्त्री नाटककार**

या स्पर्धेसाठी लिहिलेल्या अनेक एकांकिकांमध्ये स्त्रियांचा लक्षणीय सहभाग आहे.

१९९३ ‘मंजू’, सोनाली कुलकर्णी, १९९६ ‘आंतरपाट’, यात चौघी मैत्रिणींनी समूह लेखन केलेली एकांकिका आहे.  सारिका भोसले, प्राची पाटकर, स्मिता लेंभे आणि लीना नाटेकर या विद्यार्थिनींनी एकत्रितरित्या संहिता लेखन केले आहे. १९९७ ‘नो ॲडमिशन’ अमृता कोल्हटकर, १९९८ ‘वाटा’, विभावरी दीक्षित देशपांडे  अशा अनेक दर्जेदार एकांकिकांचे लेखन केलेले आढळते.

याच काळात विनिता पिंपळखरे याही खूप मोठ्या प्रमाणात एकांकिका लेखन करत असून त्यानंतर त्यांचा विक्रम ही नोंदवला गेला आहे. ‘सखुजी ठोकू या’ आणि ‘अशाच ही’ त्यांच्या एकांकिकांची नावे आहेत. तसेच आशा भिडे यांच्या ‘स्त्रीमुक्ती हवी पण कोणापासून’ आणि ‘डोन्ट वरी’ ह्या एकांकिका प्रकाशित झालेल्या दिसतात. माधुरी भिडे यांची ‘चोर सापडला’, शशिकला मेहता यांची ‘नवरे हटाव’, मीरा धाराशिवकर यांची ‘श्रीदेवीचा दणका’ आणि ‘तुझी माझी पालखी’ तसेच सुरेखा शहा यांच्या ‘पारख’ आणि त्यानंतर ‘न्याय


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

फुलाला शाप देठाला' 'प्रश्न पाहुणा येता मंडळात' अशा स्त्रीच्या मनोविश्वाला सामावून घेणाऱ्या अनेकविध एकांकिका या काळात स्त्री लेखिकांनी लिहिलेल्या दिसतात. 'सर्वस्वी तुझाच आहे' १९५७ स्नेहप्रभा प्रधान यांनी लिहिलेले नाटक. विवाहित पुरुषाशी प्रेम करून आयुष्याची कशी विदारक अवस्था होते याचे वास्तव चित्रण या नाटकात केलेले आहे.

**संदर्भग्रंथ सूची**

1. स्त्री नाटककारांची नाटके (1850 ते 2002):डॉक्टर मधुरा कोरान्ने स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस प्रथम आवृत्ती 24 मार्च 2002
2. लोकनगर रंगभूमी: डॉ. तारा भवाळकर नीहारा प्रकाशन प्रथम आवृत्ती 6 मार्च 1989
3. मराठी नाटक आणि रंगभूमी विसावे शतक : वसंत आबाजी डहाके पॉप्युलर प्रकाशन पहिली आवृत्ती 2019/१९४१
4. स्त्री साहित्याचा मागोवा खंड चार
5. संपादक डॉक्टर मंदा खांडगे डॉक्टर नीलिमा गुंडी डॉ.ज्योत्स्ना आफळे साहित्यप्रेमी भगिनी मंडळ पुणे यांचा प्रकल्प
6. उत्तम उत्तम एकांकिका पुरुषोत्तम च्या खंड 1: महाराष्ट्रीय कलोपासक पुणे प्रथम आवृत्ती 3 ऑगस्ट 2014
7. नाट्यकोश: राज्य मराठी विकास संस्था दादासाहेब फाळके चित्रनगरी, संपादक विलास खोले , सहसंपादक डॉ. वंदना बोकील कुलकर्णी.
8. विविध एकांकिका संग्रह


Copyright © | JET Network, All Rights Reserved